रात्रशाळेतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवाशर्ती व अन्य सर्वसाधारण बाबींच्या अंमलबजावणीबाबत सल्ला देण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र. क्र.२८४/टीएनटी-१

चौथा मजला,खोली क्र. ४४०, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरू चौक मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२
तारीख: २५ जुलै, २०१९

वाचा :-

१) **शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र. क्र.५८/टीएनटी-१, दिनांक १७.५.२०१७**
२) **शासन शुद्धीपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र. क्र. ५८/टीएनटी-१, दिनांक ८.६.२०१८**

प्रस्तावना :-

केंद्र शासनाचा बालकांचा मोफ़त व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांकरिता लागू करण्यात आला आहे. समाजातील आर्थिक व दुर्बल घटकांच्या सोयीसाठी एक सामाजिक गरज म्हणून स्थापन करण्यात आलेल्या रात्रशाळांबाबत सुद्धा निश्चित धोरण आखणे आवश्यक असल्याने रात्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबी, रात्रशाळेची संचमान्यता इत्यादी बाबींच्या संदर्भात संदर्भ-१ मधील शासन निर्णय पारित करण्यात आला आहे. परंतु दिनांक १७.५.२०१७ रोजीच्या सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य रितीने होत नसल्याच्या तक्रारी मा. विधान परिषद सदस्यांनी शासनाकडे केल्या होत्या. त्यानुसार दिनांक १७.५.२०१७ रोजीचा शासन निर्णय व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ च्या अनुषंगाने न्यायिक बाबी तपासून रात्रशाळेसंदर्भातील प्रश्न सोडविण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

रात्र शाळांना भेडसावत असलेल्या समस्यांबाबत उपाय योजना सुचविण्यासाठी तसेच दिनांक १७.५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी पुढील प्रमाणे अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात येत आहे-

१. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे	- अध्यक्ष
२. विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई	- सदस्य सचिव
३. मासूम (मुंबई विभागातील अशासकीय संघटना)	- अशासकीय सदस्य

उपरोक्त समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेलः-

१) शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०१६/प्र. क्र. ५८/टीएनटी-१, दिनांक १७.५.२०१७ मधील तरतूदींची अद्याप अंमलबजावणी न होण्यामागील अडचणी/ कारणांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे.

२) महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतूदींनुसार रात्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांकडे असलेला कार्यभार/ रात्रशाळेचा कार्यकाल सुधारीत करण्यासाठी शासनास शिफ़ारस करणे व त्यासाठी निर्माण होणा-या वित्तीय भाराची गणना करणे.

उपरोक्त नुसार अभ्यासगट सर्वंकष अभ्यास करून आपला अहवाल शासनास चार आठवड्यांमध्ये सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२५१२२१४२९५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swapnil Yashwantrao Kapadnis

Digitally signed by Swapnil Yashwantrao Kapadnis
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d4a2777935572a300d248b2271dd1361e9daca04be6c6776fa9545e2476799d, cn=Swapnil Yashwantrao Kapadnis
Date: 2019.07.25 12:30:50 +05'30'

(स्वप्निल कापडणीस)
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
२. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३. विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई
४. मासूम, प्लॉट क्र. ७८८, पारसी कॉलनी, दादर टी. टी. सर्कल जवळ, जेम जमशेद मार्ग, दादर (पू.), मुंबई- ४०० ०१४